# विभाग- कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग

## १०० दिवस कार्यक्रमाची सद्यस्थितीनिहाय माहिती

| अ.क्र. | मुद्दा | कार्यवाही पूर्ण/अपूर्ण | पूर्ण असल्यास त्याबाबतची माहिती व शासन निर्णय / फोटो/ इ. अभिलेख किंवा त्याची लिंक | अपूर्ण असल्यास सद्यस्थिती व कार्यवाही पूर्ण करण्याची कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| १ | **खाजगी पदयोजन एजन्सी (Private Placement Agencies) चे नियमन करणे, त्यांची नोंदणी करणे, त्यांच्या कामकाजात पारदर्शकता आणणे इ. करीता नवीन कायदा तयार करणे.** | कार्यवाही पूर्ण | रोजगार इच्छुक उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्याकरीता समन्वय करण्याचे काम करणाऱ्या Private Placement Agencies ची नोंदणी करुन त्यांच्या कामकाजात पारदर्शकता आणण्याकरिता **महाराष्ट्र खाजगी पदयोजन एजन्सीं (विनियमन) अधिनियम, २०२५** दि.२८/०४/२०२५ रोजी राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आला आहे.<br><br>अधिनियम लिंक-<br>https://drive.google.com/file/d/1DsnCMqqTmEP-tG4BrOcy6dcv7isS5yTt/view?usp=sharing | |
| २ | **युवक-युवतींच्या रोजगार क्षमतेत वाढ करण्यासाठी १,१०,००० युवकांना अल्प कालावधीचे प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षीत करणे.** | कार्यवाही पूर्ण | दि.१५.१२.२०२४ ते २३.०४.२०२५ पर्यंत राज्य व केंद्र शासनाच्या ५ योजनांतर्गत १२७१ प्रशिक्षण केंद्रांव्दारे १,४५,१७६ युवक-युवतींना २९० अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. सदर प्रशिक्षणामध्ये महिलांचा सहभाग ५७ टक्के आहे. सदर प्रशिक्षणामुळे युवक-युवतींच्या **रोजगार मिळवण्याच्या क्षमतेत** वाढ होणार आहे.<br><br>https://drive.google.com/drive/folders/1mplWo6mG4tfbBIafNx4UMfdh3TJpEFEX | |
| ३ | **युवक-युवतींच्या रोजगार क्षमतेत वाढ होण्याकरीता मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत ५०,००० युवकांना प्रशिक्षण संधी उपलब्ध करुन देणे.** | कार्यवाही पूर्ण | मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत ६ महिन्यांकरिता पात्र उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात येणार होते. तथापि, १० मार्च २०२५ च्या शासन निर्णयान्वये प्रशिक्षणाचा कालावधी ११ महिन्यांचा करण्यात आला आहे. आतापर्यंत सदर योजनेंतर्गत १.३३ लक्ष प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण घेत आहेत. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर युवक-युवतींच्या रोजगार मिळविण्याच्या क्षमतेत वाढ होणार आहे.<br>शासन निर्णय – लिंक<br>https://drive.google.com/file/d/१AE५२Yp८w१ZRXRb६jdCyzCVe६REy__MCf__/vie | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | w?usp=sharing | |
| ४ | **महिलांना रोजगारक्षम बनविण्यासाठी Microsoft यांच्या सहयोगाने Microsoft Skills व AI प्रशिक्षण देणे.** | कार्यवाही पूर्ण | रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाने Microsoft Corporation च्या सहकार्याने १०००० हून अधिक विद्यार्थीनी / महिलांना कृत्रिम बुध्दिमत्ता ( AI) विषयक अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.<br>फोटो लिंक-<br>https://mssu.ac.in/rtmssu/rtmssu-microsoft-ai-training/ | |
| ५ | **रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी १०० रोजगार मेळावे आयोजित करुन १०,००० युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देणे.** | कार्यवाही पूर्ण | रोजगार प्रदाता व बेरोजगार युवक-युवतींना एकत्र व्यासपीठ उपलब्ध करुन उद्योगांना गुणवत्तापूर्ण मनुष्यबळ प्राप्त करुन घेण्याची व बेरोजगार युवक-युवतींना नामांकित कंपन्यांमध्ये रोजगाराची संधी मिळण्याकरीता दि.०१.०१.२०२५ ते दि.१५.०४.२०२५ दरम्यान १५९ रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यांमध्ये २२९१ आस्थापनांनी सहभाग घेतला तर १८,४४८ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली आहे. यामुळे युवक-युवतींना रोजगाराची संधी मिळेल.<br>फोटो लिंक-<br>https://drive.google.com/drive/folders/१HBbH०z४GEqXbT_f५JLJ५i९HOqAQPCr२i?usp=sharing | |
| ६ | **औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या प्रशिक्षणार्थ्यांना ऑन द जॉब ट्रेनिंग, उद्योग भेटी इ. करीता १००० औद्योगिक आस्थापनांसमवेत सामंजस्य करार करणे.** | कार्यवाही पूर्ण | औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या ( ITI ) प्रशिक्षणार्थ्यांना ऑन द जॉब ट्रेनिंग, इंडस्ट्री विजिटस, शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण, रोजगार, इत्यादींमध्ये सहकार्य करण्यासाठी १२९७ औद्योगिक आस्थापनांसमवेत सामंजस्य करार करण्यात आले आहेत.<br>Website:<br>https://msbsvet.edu.in/Skill/Program१००DaysReport.aspx | |
| ७ | **राज्यात स्टार्टअप ला पोषक वातावरण निर्माण होण्यासाठी राष्ट्रीय स्टार्टअप कॉन्क्लेव्ह आयोजित करणे.** | कार्यवाही पूर्ण | राज्यात स्टार्टअप करिता पोषक वातावरण निर्माण होण्याकरीता दि. १६.०१.२०२५ रोजी मुंबई येथे राष्ट्रीय स्टार्टअप कॉन्क्लेव्ह आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात १००० स्टार्टअप यांनी सहभाग नोंदविला.<br><br>शासन निर्णय – लिंक<br>GR_07082024.pdf | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | फोटो लिंक-<br>https://drive.google.com/drive/folders/१J५piB६zAU८oCiEye७gfMe__s५PXWE०Q ५८?usp=drive__link | |
| ८ | **महाराष्ट्रात स्टार्ट-अपना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र स्टार्टअप वीक आयोजित करणे.** | कार्यवाही पूर्ण | दि.१०.०२.२०२५ ते दि. १३.०२.२०२५ दरम्यान मुंबई येथे स्टार्टअप वीक(Start Up Week) आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात १२ राज्यातील २०००+ स्टार्टअप्सनी सहभाग नोंदविला. यापैकी १०० निवडक स्टार्टअपच्या सादरीकरणानंतर त्यातून २४ उत्कृष्ट स्टार्टअप्सची निवड करण्यात आली. सदर स्टार्ट-अप ची उत्पादने संबंधित शासकीय विभागांशी जोडण्याकरिता सामान्य प्रशासन विभागाच्या **Tech वारी** उपक्रमात निवड झालेल्या स्टार्ट-अप चे सादरीकरण (Presentation)आयोजित करण्यात आलेले आहे.<br>शासन निर्णय – लिंक<br>27062018 Maharashtra Start-up Week.pdf<br><br>फोटो लिंक-<br>https://drive.google.com/drive/folders/१J५piB६zAU८oCiEye७gfMe_s५PXWE०Q५८?usp=drive_link | |
| ९ | **व्यवसाय विषयक अभ्यासक्रमांचे You Tube चॅनेल सुरु करुन अभ्यासक्रम निहाय ५०० व्हिडीयो उपलब्ध करुन देणे.** | कार्यवाही पूर्ण | महत्तम प्रशिक्षण क्षमता असलेल्या ६५ व्यवसाय अभ्यासक्रमांचे १६२२ व्हिडीयो www.youtube.com/@e-Mahaskill या युटयुब वर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.<br>फोटो लिंक-<br>https://drive.google.com/drive/folders/१V५p७whPsHsXgtiOHSulrNCHLL३Cd९xmW?usp=drive_link<br><br>Videos:<br>https://www.youtube.com/@e-Mahaskill/videos | |
| १० | **महाराष्ट्र राज्य, कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाकरिता ऑनलाईन प्रणाली अद्यावत करुन १** | कार्यवाही पूर्ण | महाराष्ट्र राज्य, कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाद्वारे माहे जानेवारी/ फेब्रुवारी २०२५ सत्राच्या **परीक्षा AI तंत्रज्ञानावर आधारित Online पध्दतीने** Android Mobile Application व Web Application व्दारे ३,४४० परीक्षार्थ्यांची परीक्षा घेण्यात येवून सदर परीक्षेचा निकाल ७ दिवसांत घोषित करण्यात आला. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **वर्ष कालावधीच्या अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेणे.** | | फोटो लिंक-<br>https://drive.google.com/drive/folders/१V५p७whPsHsXgtiOHSulrNCHLL३Cd९xmW?usp=drive_link<br><br>Videos:<br>https://www.youtube.com/@mahaskillboard९२०७/videos | |
| ११ | **शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी राज्यस्तरीय तंत्रप्रदर्शन व पारंपारिक क्रीडा स्पर्धा आयोजित करणे.** | कार्यवाही पूर्ण | **तंत्रप्रदर्शन**<br>शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थास्तरावर ३९३ ठिकाणी, जिल्हास्तरावर ३६ ठिकाणी व विभागस्तरावर ६ ठिकाणी तंत्रप्रदर्शनांचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनांमधुन १२ राज्यस्तरीय विजेते घोषित करण्यात आले आहेत.<br>**क्रीडा स्पर्धा**<br>राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा दि.०८ व ०९ मार्च, २०२५ रोजी नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेत १,३३५ स्पर्धकांनी एकूण २२ पारंपारिक व प्रचलित क्रीडा प्रकारांत सहभाग घेतला.<br>फोटो लिंक-<br>https://drive.google.com/drive/folders/१V५p७whPsHsXgtiOHSulrNCHLL३Cd९xmW?usp=drive_link | |
| १२ | **शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना डिजीटल स्वरुपात अध्ययन सामग्री उपलब्ध होण्याकरीता छ. संभाजीनगर व मुलूंड ITI येथे प्रायोगिक तत्वावर Digital Library तयार करणे:-** | कार्यवाही पूर्ण | छत्रपती संभाजीनगर, मुंबई व अमरावती येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये डिजिटल ग्रंथालय स्थापन करण्यात आले आहे. तसेच ३७३ शासकीय औ.प्र. संस्थांनी ग्रंथालयाचे रुपांतर डिजिटल ग्रंथालयात रुपांतर केले आहे. सदर ग्रंथालयात १६००+ डिजिटाइज्ड (Digitized) कोर्सेस उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.<br>शासन निर्णय – लिंक<br>२०२५०२२११२५५१६८४०३.pdf<br><br>फोटो लिंक-<br>https://drive.google.com/drive/folders/१V५p७whPsHsXgtiOHSulrNCHLL३Cd९xmW?usp=drive_link | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | **महाराष्ट्रात स्टार्ट-अप ला प्रोत्साहन देण्यासाठी SIDBI यांच्या समवेत स्टार्टअप मध्ये गुंतवणूक करण्यासाठी रु.१०० कोटींचा Fund of Fund स्थापित करणे.** | कार्यवाही पूर्ण | महाराष्ट्रातील नवीनतम तंत्रज्ञानावर आधारीत स्टार्टअप्सना व्यवसाय वाढीला चालना मिळण्याच्या अनुषंगाने स्टार्टअप मध्ये गुंतवणूक करण्यासाठी SIDBI (Small Industrial Development Bank of India) यांच्यासमवेत दि.१६.०१.२०२५ रोजी रु.100 कोटींचा Fund of Fund स्थापित करण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे.<br>फोटो लिंक-<br>https://drive.google.com/drive/folders/१J५piB६zAU८oCiEye७gfMe_s५PXWE०Q५८?usp=drive_link | |
| १४ | **शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये अद्यावत प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करुन प्रशिक्षण क्षमता वृध्दींगत करणे.** | कार्यवाही पूर्ण | Electric Vehicle, Solar व Refrigeration and Air Condition (RAC) अभ्यासक्रमांत अल्प कालावधीचे प्रशिक्षण देऊन अनुक्रमे ४४, १८६ व १० उमेदवारांना नियुक्ती पत्र देण्यात आले आहे.<br>३४९ नवनियुक्त निदेशकांना क्षमतावृद्धीसाठी प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाव्दारे इतर संस्थांच्या सहकार्याने अद्यावत तंत्रज्ञानावर आधारित २८ नविन अभ्यासक्रम तयार करण्यात आले आहेत.<br>फोटो लिंक-<br>https://drive.google.com/drive/folders/१V५p७whPsHsXgtiOHSulrNCHLL३Cd९xmW?usp=drive_link | |
| १५ | **कौशल्य विषयक अभ्यासक्रमांसाठी Credit Transfer सुविधा उपलब्ध करुन देणे.** | कार्यवाही पूर्ण | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने राज्यातील महाविद्यालयांमधील आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रामधून कौशल्य विकास प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कौशल्य विकास अभ्यासक्रमाचे क्रेडीट (Credit) त्यांच्या अपार आयडी (APAR ID) मध्ये जमा होणार आहेत.<br>त्याअनुषंगाने मुंबई विद्यापीठा बरोबर सामंजस्य करार करण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६ | **महिलांव्दारे चालविल्या जाणाऱ्या स्टार्टअपला सहाय्य करण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्टार्टअप योजनांतर्गत ५१ महिला Startup यांना अनुदान देणे.** | कार्यवाही पूर्ण | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्टार्टअप योजनांतर्गत दोन टप्प्यात एकुण ५२ महिला स्टार्टअप्स यांची निवड करुन त्यांना रु.२.३४ कोटी अनुदान वितरीत करण्यात आले आहे.<br>शासन निर्णय लिंक-<br>GR-Mahila Startup Yojana_Punyashlok Ahilyadevi Holkar Scheme-09072024.pdf<br><br>फोटो लिंक-<br>https://drive.google.com/drive/folders/१J५piB६zAU८oCiEye७gfMe_s५PXWE०Q५८?usp=drive_link | |
| १७ | **प्रशिक्षणार्थ्यांना परदेशात रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याकरीता राज्यात ६ ठिकाणी महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय केंद्र स्थापन करणे.** | कार्यवाही प्रगतीपथावर आहे. | प्रशिक्षणार्थ्यांना परदेशात रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने राज्यात ६ ठिकाणी **महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय केंद्र** स्थापन करण्याच्या निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यापैकी अमरावती , नागपूर व मुंबई या ३ ठिकाणी महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय केंद्र स्थापन करण्याबाबत RFP (Request for Proposal) प्रसिध्द करण्यात आलेले असून सध्या त्याची अंतिम मुदत दि. ०७.०५.२०२५ पर्यंत आहे. वरील ३ केंद्र कार्यरत झाल्यानंतर उर्वरित तीन ठिकाणची केंद्र सुरू करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. | |
| १८ | **मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थ्यांची उपस्थिती पारदर्शकपणे नोंदविण्यासाठी प्रशिक्षणार्थ्यांचे Aadhaar Based Attendance सुरू करणे.** | कार्यवाही प्रगतीपथावर आहे. | मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत राज्यातील प्रशिक्षणार्थ्यांचे सर्व खाजगी आस्थापनांमध्ये Aadhaar Based Attendance प्रणाली उपलब्ध करुन देण्यासाठी NIC ची मदत घेण्यात येत आहे. याबाबतची कार्यवाही दि. ३१.०५.२०२५ पर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे. | |
| | | **एकुण -१८** | कार्यवाही पूर्ण- १६ | प्रगतिपथावर कामे-२ |